**ठळक बातम्या**

- पावसाळी अधिवेशनात तब्बल ९७ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या पुरवणी मागण्या सादर

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांचा मुंबईत एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

- विधानपरिषदेच्या निवडणुकीत ११ पैकी १० जागांवर महायुती विजयी, नाशिकमध्ये अपक्ष उमेदवाराकडून शिवसेना उमेदवाराचा पराभव

- उत्तरप्रदेशात लखनौमध्ये कोचिंग सेंटरला लागलेल्या आगीत १४ विद्यार्थ्यांचा मृत्यू

आणि

- राज्यात मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक वातावरण, येत्या २ दिवसात मुंबईपर्यंत येण्याचा अंदाज

<><><><><>

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पहिल्याच दिवशी आज एकंदर ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर झाल्या. यात सर्वाधिक, २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी करण्यात आली आहे. त्याखालोखाल १० हजार ७ कोटी १० लाख रुपयांची तरतूद केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत बिनव्याजी कर्जासाठी केली आहे. विकसित भारत जी-राम-जी योजनेसाठी केंद्र आणि राज्याचा हिस्सा ७ हजार ३६७ कोटी ३२ लाख रुपये इतका आहे, तर सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणीसाठी ३ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाच्या २२ हजार १५ कोटी ४२ लाख, नगर विकास विभागाच्या १५ हजार १५२ कोटी ४३ लाख, तर उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाच्या १४ हजार ७६० कोटी ४८ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांचा यात समावेश आहे.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांनी आज मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. संजय दिना पाटील, ओमप्रकाशराजे निंबाळकर, संजय वाकचौरे, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर आणि संजय जाधव यांचा यात समावेश आहे.

हे खासदार बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या खऱ्या शिवसेनेत सामील झाले असून प्रवेशाची प्रक्रिया कायद्यानुसारच झाल्याचं एकनाथ शिंदे यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं. या सर्व खासदारांच्या मतदारसंघातले प्रश्न सोडवले जातील, विकासनिधी कमी पडू दिला जाणार नाही, खासदार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना सन्मानाने वागवलं जाईल, अशी हमी शिंदे यांनी खासदारांना दिली. तसंच सहा खासदारांच्या प्रवेशामुळे शिवसेना राज्यात भक्कम होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**होल्ड बाईट शिंदे**

या खासदारांच्या प्रवेशाच्या मुद्द्यावरुन माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे. ते म्हणाले.

**होल्ड - आदित्य बाइट**

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. अकरापैकी दहा जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले असून नाशिकच्या एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला, तर सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडले गेले, त्यामुळे **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींद्वारे निवडल्या जाणाऱ्या** विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत १७ पैकी १६ जागा जिंकत महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. महाविकास आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड व्हाइस कास्ट**

***(नांदेड*** *मतदारसंघात काँग्रेसमधून भाजपात आलेले अमरनाथ राजुरकर यांचा मोठ्या फरकाने विजय झाले.* ***त्यांचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे उमेदवार कृष्णा पाटील आष्टीकर यांना केवळ ८४ मतं मिळाली. सांगली सातारा*** *मतदारसंघातून भाजपाचे धैर्यशील कदम,*

***भंडारा गोंदिया मधून*** *अविनाश ब्राह्मणकर,* ***छत्रपती संभाजीनगर - जालना मधून*** *सुहास शिरसाट,* ***जळगाव*** *मधून नंदकिशोर महाजन,* ***सोलापूर*** *राजेंद्र राऊत,* ***अमरावती*** *प्रवीण पोटे तर* ***लातूर-बीड-धाराशिव*** *मतदारसंघातून काँग्रेसमधून भाजपात आलेले बसवराज पाटील विजयी झाले आहेत.* ***नागपूर*** *मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपाच्या राजीव पोतदार यांनी विजय मिळवला. तर* ***परभणी-हिंगोली*** *मतदारसंघातून शिवसेनेचे सईद खान विजयी झाले.*

***नाशिक*** *मतदारसंघातून शिवेसेनेचे नरेंद्र दराडे यांना पराभवाचा सामना करावा लागला. भाजपा नेते गणेश गिते यांचे बंधू गोकुळ गिते हे अपक्ष म्हणून तिथून निवडून आले.*

*या निवडणुकीत सहा उमेदवार याआधीच* ***बिनविरोध*** *निवडून आले आहेत. ठाणे मतदारसंघातून शिवसेनेचे रवींद्र फाटक, यवतमाळ इथून शिवसेनेचे दुष्यंत चतुर्वेदी, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे, पुणे इथून राष्ट्रवादीचेच विक्रम काकडे, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर इथून भाजपाचे अरुण लखानी आणि अहिल्यानगर मतदारसंघातून भाजपाचे प्राजक्त तनपुरे यांचा यात समावेश आहे.)*

**<><><><><>**

पुण्यात भिडेवाडा इथं मुलींसाठी देशातली पहिली शाळा सुरु झाली, याचा उल्लेख बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात महाराष्ट्रातली मुलींसाठीची पहिली शाळा, असा झाला आहे. ही चूक दुरुस्त करण्याची मागणी अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात लखनौ मध्ये अलीगंज इथं आज दुपारी एका कोचिंग सेंटरमध्ये लागलेल्या आगीत १४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले विद्यार्थी १६ ते १८ वयोगटातले होते. अलीगंजमध्ये पुरनिया भागात एका इमारतीत हे कोचिंग सेंटर चालवलं जात होतं. या दुर्घटनेत काही जण जखमी झाले असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

दुर्घटनास्थळी बचाव मोहीम राबवली जात असून, अडकलेल्या लोकांची सुटका करण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान इमारतीच्या सर्व भागात शोध घेत असल्याचं उत्तरप्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी बातमीदारांना सांगितलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे. केंद्र सरकारनं प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या नातेवाईकांना 2 लाख रुपये आणि जखमींना 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. राज्य सरकारनंही आर्थिक मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुंबई-गोवा महामार्गावर नेमळे गावात एका चारचाकी गाडीच्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले.

<><><><><>

गोंदियात एक भरधाव प्रवासी बस अनियंत्रित होऊन झाडाला धडकल्यामुळे झालेल्या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला असून १० ते १२ प्रवासी किरकोळ जखमी झाले.

<><><><><>

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरच्या दिशेनं निघालेल्या शेगावच्या गजानन महाराजांच्या पालखीचं आज अकोला जिल्ह्यातल्या भौरद इथं आगमन झालं. जिल्ह्याच्या सीमेवरच्या गावांमधल्या भाविकांनी या पालखीचं उत्साहात स्वागत केलं.

<><><><><>

राज्यातल्या फळपीक विमा योजनेच्या लाभार्थींना त्यांच्या नुकसानीची अचूक भरपाई मिळवून देण्यासाठी प्रत्येक गावात 'हवामान केंद्र' बसवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे लवकरच पाठवणार असल्याचं कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज सांगितलं.

<><><><><>

जालना जिल्ह्यात उष्णतेची तीव्र लाट कायम असल्यामुळे, विद्यार्थ्यांचं हित लक्षात घेता, जिल्ह्यातल्या सर्व शाळा सकाळच्या सत्रात भरवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

<><><><><>

नीट फेरपरीक्षेत पुन्हा पेपर फुटल्याच्या वृत्ताचा एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं इन्कार केला आहे. नीट फेरपरीक्षा २०२६ चा पेपर टेलिग्राम या समाजमाध्यम मंचावर परीक्षेआधी फुटल्याची चर्चा होती. मात्र कालची परीक्षा सुरक्षित आणि गैरप्रकारमुक्त

वातावरणात पार पडल्याचं एनटीएने म्हटलं आहे. या प्रकरणी जबाबदार व्यक्तींविरोधात कारवाई केली जाईल. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि इतर यंत्रणांच्या मदतीनं या प्रकाराचा तपास सुरु आहे. विद्यार्थी आणि पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणतीही माहिती नीट परीक्षेच्या www.neet.nta.nic.in या संकेतस्थळावर पडताळून पहावी असं आवाहन एनटीएने केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईसह राज्याच्या अनेक भागात आज पावसानं हजेरी लावली. मुंबई शहर आणि उपनगरांत तसंच ठाणे, पालघर आणि नवी मुंबईमध्ये आज सकाळी पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. रत्नागिरी जिल्ह्यात पुनरागमन केलेल्या पावसानं आजही हजेरी लावल्यानं सर्वत्र आनंदाचं वातावरण आहे.

**धुळे** शहर आणि परिसरात आज मान्सूनचं आगमन झालं. धुळे शहरासह जिल्ह्याच्या बहुतांश भागात दुपारी मेघ गर्जनेसह मध्यम स्वरुपाचा पाऊस पडला.

**गडचिरोली** शहरासह जिल्ह्याच्या अनेक भागांत आज दुपारनंतर मेघगर्जनेसह पावसाच्या जोरदार सरी बरसल्या.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पावसानं आज तळकोकणातून आगेकूच करत कोकण, पश्चिम महाराष्ट्राच्या पुढच्या काही भागापर्यंत मजल मारली. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, सातारा, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि पुणे जिल्ह्याचा काही भाग, तसंच मराठवाड्यातल्या काही जिल्ह्यांमध्ये तो सक्रीय झाला आहे. येत्या दोन दिवसात नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळं मुंबई, ठाणे, पालघर, कोकणात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरुपाचा पाऊस होईल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तसंच, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही काही जिल्ह्यांमध्ये हीच स्थिती राहील. अकोला, अमरावती, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**//<><><><><>//**